स्थायी समितीच्या **बुधवार दिनांक 19—08—2015** रोजी **सायंकाळी 05—00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 10. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 11. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 12. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 14. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 15. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 147</u>:— प्रभाग क्र. 40 ब गवळीपुरा येथील परिसरात सिमेंट कॉक्रीट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त 4 निविदांपैकी मे. जी.बी.कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरांपेक्षा 12.04 प्रतिशत ने कमी दरांची रू. 26,93,421/— (अक्षरी सव्वीस लक्ष त्र्याण्णव हजार चारशे रूपये फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 148</u>:— प्रभाग क्र. 20 अ येथील पंजाबी लाईन येथे सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रू.

25,99,996/— (अक्षरी पंचवीस लक्ष नव्याण्णव हजार नऊशे शहाण्णव रूपये) रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. 681 व नविन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 149</u>:— नागपूर शहर मंजूर विकास आराखडयानुसार 18 मी. रूंद, जुना भंडारा रोड — मेयो हॉस्पीटल चौक ते शहीद चौक, इतवारी ते पुढे सुनिल हॉटेल पर्यंतच्या रस्ता रूंदीकरणाचे विकास कामामध्ये बाधीत होणाऱ्या बांधकामा संदर्भातील याचिका क्र. 1980,1984 व 1989/2010 अन्वये मा. उच्च न्यायालयानी दिनांक 31 मार्च, 2010 चे आदेश निर्गमित केले. निर्णयाच्या अंमलबजावणीचे अनुषंगाने, निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार यांची नेमणूक करण्यात आली असून, अहवाल कर्यालयास प्राप्त आहे. सदरहू प्रकल्पाकरीता भूसंपादन हस्तांतरण प्रक्रीया, जमीनीचे त्यावेळचे मुल्यांकन व इतर प्रक्रिया करावयास अंदाजित 244.94 कोटी खर्च अपेक्षित आहे.

वित्त विभागाचे अभिप्रायानुसार विशेष निधीची तरतूद झाल्याशिवाय असा खर्च म.न.पा.स स्वनिधीतून करणे शक्य नाही.

मध्य विभाग विकास आघाडी ने जुना भंडारा रोड — मेयो हॉस्पीटल चौक ते शहीद चौक, इतवारी ते सूनिल हॉटेल पर्यंचा रस्ता विकास आराखडयानुसार 18.00 मी. रूंद करण्यात या अशा आशयाची मा. उच्च न्यायालय, येथे पीआयएल 35/2015 दाखल केली असता, मा. उच्च न्यायालयाने प्रास्तावित विकास आराखडयानुसार रूंदीकरणाबाबत म.न.पा. काय निर्णय घेणार अशी विचाराणा केलेली असून, म.न.पा. चे जेष्ठ विधीज्ञ/अधिवक्ता यांनी रूंदीकरणाचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे सादर करण्यात येईल व त्याबाबतच्या निर्णयाची माहिती दिनांक 12.06.2015 रोजी मा. न्यायालयात सादर केली जाईल असे अभिवचन दिले आहे. प्रस्तुत प्रकरण स्थायी समितीचे विचारार्थ तथा निर्णयार्थ सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विभागाचे अभिप्रायानुसार विशेष निधीची तरतुद झाल्याशिवाय असा खर्च म.न.पा.स स्वनिधीतून करणे शक्य नाही असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे भुसंपादनाकरिता राज्य शासनाकडून विशेष निधी मिळण्याच्या दृष्टीने म.न.पा. सभागृहाच्या मंजूरीसाठी पाठविण्याची शिफारस करण्यांत येते, या सुचनेस समितीने एकमताने मंजूरी मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 150</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर